दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | बुधवार दि.६ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -७६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## दादा आणि पवार साहेबांनी एकत्र यावे

**पुणे (वृत्तसंस्था)**-अभिनेता आणि कॉमेडीयन भाऊ कदम अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करताना दिसणार आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा बोलून दाखवली आहे. तसेच अजित पवार आणि शरद पवारांनी एकत्र यावे, असे देखील त्यांना वाटत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना भाऊ कदम म्हणाले, अजित पवारांनी लाडकी बहीण योजना आणली. प्रचंड मेहनत करणारा नेता आहे, म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा स्टार प्रचारक म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मी पक्षात प्रवेश केला नसून केवळ स्टार प्रचारक म्हणून काम करणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. मी राजकारण करत बसलो तर सगळी कामे बाजूला राहतील, असेही भाऊ कदम म्हणाले.भाऊ कदम म्हणाले, मी अजित पवारांना भेटलो तेव्हा त्यांनी मला विचारले, हवा येऊ द्या का बंद झाले, त्यांना तो कार्यक्रम खूप आवडायचा. स्ट्रेसमध्ये असलो की मी कार्यक्रम पाहायचो, असे त्यांनी मला सांगितले. पुढे बोलताना भाऊ कदम म्हणाले, पवार कुटुंबात काय झाले मला माहिती नाही, मात्र मला वाटते शरद पवार आणि अजित पवारांनी एकत्र यायला हवे आणि अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा देखील त्यांनी बोलून दाखवली आहे. एकच वादा अजित दादा, गद्दारीबद्दल मी बोलणार नाही, त्यातील नेमकी माहिती माझ्याकडे नाही, असेही स्पष्टीकरण भाऊ कदम यांनी दिले.

# मी मुख्यमंत्रीपदासाठी तयार:रामदास आठवले यांनी व्यक्त केली इच्छा

## मनोज जरांगेंच्या भूमिकेचेही केले स्वागत;कार्यकर्त्यांनी बंडखोरीच्या मागे उभे राहू नये

नाशिक (वृत्तसंस्था)-आमच्यामध्ये वाद झाले तर तर मुख्यमंत्री पदासाठी मी तयार आहे, असे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले आहेत. नाशिक येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे. केंद्रीय नेते आणि आम्ही निर्णय घेऊ, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले आहे.पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, जरांगे पाटील यांच्या भूमिकेचा आम्हाला फायदा होणार आहे. राज ठाकरेंनी आपले उमेदवार उभे केले त्याचा फायदाही आम्हाला होणार आहे. राजू शेट्टी, संभाजीराजे यांच्या आघाडीचा देखील आम्हाला फायदा होणार असल्याचे आठवले म्हणाले. तसेच आमच्या पक्षाला ४ ते ५ जागा मिळायला पाहिजे होत्या, मात्र एकच जागा देण्यात आली आहे. तरीही कार्यकर्त्यांनी बंडखोरीच्या मागे उभे राहू नये. केंद्रीय मंत्री, महामंडळ अशी पदे आपल्याकडे आहेत, त्यामुळे कार्यकर्त्यांनी महायुतीच्या मागे उभे राहावे, असे आवाहन देखील त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. याच सोबत नवीन मित्र झाले म्हणून आम्हाला भाजपने मागे टाकू नये, असा इशारा देखील रामदास आठवले यांनी दिला आहे.पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, आरपीआयच्या मतांचा महायुतीला फायदा झाला आहे. हरियाणामध्ये लोकसभेला कमी जागा आल्या, मात्र विधानसभेला जास्त जागा आल्या. आमचा आत्मविश्वास वाढला आहे. ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढणार आहोत. तसेच मराठा समाजाच्या मागे सरकार उभे आहे. गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे, असे देखील आठवले यावेळी म्हणाले.नोज जरांगे यांच्याविषयी बोलताना रामदास आठवले म्हणाले, जरांगे फॅक्टर चालणार नाही. मराठा समाजाच्या मागे सरकार उभे आहे. गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे, पण केंद्राने आर्थिक १० टक्के आरक्षण दिले आहे. मनोज जरांगे यांची मागणी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची आहे. सर्व मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण देणे शक्य नाही. तसेच कोणाला ओबीसी म्हणायचे हा सर्वस्वी अधिकार केंद्राचा आहे, असेही रामदास आठवले यांनी स्पष्ट सांगितले आहे.पत्रकार परिषदेत बोलताना रामदास आठवले म्हणाले, मनोज जरांगेंची भूमिका योग्य, त्यांना आता राजकारण कळू लागले आहे. काही वेळा दोन पावले मागे यावे लागते. मनसे महायुतीमध्ये नाही, त्यांनी काही उमेदवार उभे केले आहेत. भाजप आणि मनसेमध्ये अंडरस्टॅंडिंग आहे. मनसेचा युतीला फायदा होणार आहे. मुख्यमंत्री महायुतीचा होणार या राज ठाकरेंच्या मताशी सहमत आहे. आमच्यात वाद होणार नाही. केंद्रीय नेते आणि आम्ही निर्णय घेऊ. कोणात वाद झाले तर मुख्यमंत्री पदासाठी मी तयार आहे, असे त्यांनी थेट सांगितले आहे.



## गंगापूरमध्ये १८ उमेदवार रिंगणात;२७ जणांची माघार

**छ.संभाजीनगर | प्रा.संजय तुपे**

गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघात एकूण ४५ उमेदवारांपैकी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी २७ जणांनी माघार घेतली आहे. आता एकूण १८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गंगापूर तहसील कार्यालयात उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी

उमेदवारांची झुंबड उडाली होती. गंगापूर शहरांमध्ये नेत्यांसह सर्वत्र कार्यकर्त्यांची गर्दी दिसत होती. चार नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी



निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रशांत बंब, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण, बहुजन समाज पार्टीचे उमेदवार सतीश तेजराव चव्हाण, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अनिल चंडालिया हे प्रमुख पक्षांचे उमेदवार रिंगणात असून अपक्ष म्हणून खुलताबाद तालुक्यातील प्रा. डॉ. सुरेश सोनवणे यांच्यासह एकूण १८ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रशांत बंब यांच्या विरोधात मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण हे गंगापूरमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार आहेत.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळ चे अध्यक्ष आशिष दामले याचा रविवारी केज येथे सत्कार

**केज | सचिन भालेराव**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य च्या वतीने परशुराम आर्थिक विकास महामंडळ चे अध्यक्ष आशिष दामले यांचा सत्कार रविवारी केज येथे करण्यात येणार आहे. केज येथून परशुराम आर्थिक विकास महामंडळ व इतर मागण्यासाठी सातत्याने आंदोलन करण्यात आले होते. परशुराम आर्थिक विकास महामंडळ झाल्यामुळे ब्राह्मण समाजात चैतन्यमय वातावरण असल्यामुळे व अध्यक्ष निवडीमुळे आत्ता समाजाला लाभ मिळेल यासाठी केज येथे अध्यक्ष दामले यांचा सत्कार आयोजित केला आहे अशी माहिती धनंजय कुलकर्णी यांनी दिली

. समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य च्या वतीने समाजाच्या मागण्याचा लढा सातत्याने देण्यात आला धरणे आंदोलन मोटार सायकल मोर्चा आझाद मैदानावर धरणे पाळी ताम्हणं आंदोलन आमरण उपोषण अशी आंदोलन झाली यामुळे समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या राज्याच्या मुख्यमंत्री महोदय व उपमुख्यमंत्री महोदय सोबत तीन बैठका झाल्या मंत्रालय मुंबई २२ जानेवारी २०१९ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब , विधानभवन नागपूर २४ डिसेंबर २०२३ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व देवेंद्र फडणवीस साहेब व सहयाद्री अतिथीगृह मुंबई ३ सप्टेंबर २०२४ देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या सोबत बैठक होऊन परशुराम आर्थिक विकास महामंडळ चा अध्यदेश निघाला व कॅप्टन आशिष दामले यांची अध्यक्ष पदी नियुक्ती झाली. संघर्ष समिती च्या वतीने १० नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वा सत्काराच्या कार्यक्रम चे नियोजन केले आहे यावेळी संघर्ष समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत दिपक रननवरे जालना, श्रीकांत जोशी अकोला , अशोक वाघ जळगांव , अनिल दीक्षित धुळे , उदय जोशी नंदुरबार , विजया अवस्थी संभाजीनगर, अर्चना सरूडकर मुंबई, ईश्वर दीक्षित बुलढाणा तसेच सातत्याने सोबत असणारे संघर्ष समितीचे बीड जिल्ह्यातील सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व ब्राह्मण बंधू भगिनींनी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संघर्ष समितीचे मुख्य समन्वयक धनंजय कुलकर्णी यांनी केले आहे.

### घनसावंगी विधानसभा निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

## ३ लाख ३० हजार ४२५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार

### १७७ मतदान केंद्रावर सीसीटिव्ही बसविण्यात येणार



**जालना | असलम कुरेशी**

घनसावंगी विधानसभा मतदार संघाच्या निवडणूकीत एकुण ३५४ मतदान केंद्रावर ३ लाख ३० हजार ४२५ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार असून १७७ मतदान केंद्रावर सीसीटिव्ही बसविण्यात येणार आहे. निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

घनसावंगी विधानसभा निवडणूक शांततेत व निःपक्षपणे पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मनिषा दांडगे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार योगिता खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूकीची जय्यत तयारी करण्यात येत आहे. सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मनिषा दांडगे यांनी सांगितले की घनसावंगी विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख २४ हजार ७८३ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहे. त्यात १ लाख ६८ हजार ६९७ पुरूष, १ लाख ५५ हजार ९५२ महिला व १३४ सैनिक मतदारांचा समावेश आहे. तसेच मतदार संघात ५ हजार ६४१ नवीन मतदारांची वाढ झाली आहे. घनसावंगी विधानसभा मतदार संघात एकूण ३५४ मतदान केंद्र आहेत. निवडणूकीसाठी ३८९ पथके स्थापन केली असून निवडणूक कामासाठी मतदानासाठी १ हजार ७७२ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आली आहे.मतदानासाठी ४५ बस व २४ क्रुजर वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी एफ.एस.टि.बी.एस.टी. या विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १७७ मतदान केंद्रावर सीसीटिव्ही बसविण्यात येणार असून प्रत्येक मतदान केंद्रावर एक पोलिस व एक होमगार्डची नियुक्ती करण्यात आली असून मतदार संघात एकही मतदान केंद्र संवेदनशील नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे यांनी दिली. यावेळी तहसीलदार योगिता खटावकर, विजय चव्हाण, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, आशिष पैठणकर, अशोक बडवणे, सुशिल जाधव, विलास मुळक, कैलास अरगडे, विठ्ठल कथले आदी उपस्थित होते.

## गुरुराज माऊली,मन्मथ माऊली नामाचा जयघोष करत शेवाळा ते कपिलाधार पायी दिंडीचे धुप्पा येथे स्वागत

**नायगाव | हानुमंत चंदनकर**

गुरुराज माऊली,गुरुराज माऊली नामाचा जयघोष करत संत शिरोमणी मन्मथस्वामी संजीवनी समाधी सोहळ्यास कपिलाधार ता.अहमदपुर येथे जाण्यासाठी शेवाळा ते कपिलाधार निघालेल्या भाविक भक्त पदयात्रेचे धुप्पा ता.नायगाव येथील महात्मा बसवेश्वर चौकात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व महाआरती करून भाविक भक्ताच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.

शेवाळा येथून कपिलाधार कडे निघालेल्या या भाविकभक्त पदयात्रेचे नायगाव तालुक्यातील धुप्पा येथील शिवभक्ताच्या वतीने जागोजागी भव्य स्वागत करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे




याही वर्षी गावातील महादेव मंदिरात महाआरती करून हनुमान मंदिराच्या समोर गुरुराज माऊली मन्मथ माऊलींच्या भजनात तलीन झाले होते.हि पदयात्रा डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या आशीर्वादाने व शिदेश्र्वर शिवाचार्य महाराज गडगेकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षांपासून सातत्याने मार्गक्रमण करीत आहे. हि पदयात्रा शेवाळा ता.देगलुर येथून डोणगाव, शंकरनगर, धुप्पा,कुंचेली, गडगा, कंधार, लोहा,पालम,परळी,शिरसाळा,तेलगाव,बीडमार्ग कपिलाधार येथील संत शिरोमणी मन्मथस्वामी संजीवनी समाधी सोहळ्यास जाणार आहे.या वर्षी संततधार पाऊस झाला त्यामुळे सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे रबिच्या पेरण्या लवकर झाले आहे. त्यामुळे पायी दिंडीत जाणार्या भाविक भक्तांची मोठी संख्या वाढली असल्याचे या पदयात्रेचे प्रमुख पांडुरंग पा.शिवपुजे यांनी सांगितले, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कै. लक्ष्मण अप्पा कंधारे याच्या प्रतिमेची पुजा करून महाआरती दिंडी संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले. यावेळी गंगाराम आगलावे, अनिल स्वामी, आनंद मोतेवार, पांडुरंग पा.शिवपुजे यांच्या सह शिव भक्ताचे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एका जातीवर राजकारण होत नाही हे खरेच:बच्चू कडु यांनी केली मनोज जरांगेंच्या निर्णयाची पाठराखण

**नागपूर (वृत्तसंस्था)**-एका जातीवर राजकारण होत नाही, असे मनोज जरांगे माघार घेताना बोलले. ते बोलते ती वस्तुस्थिती आहे. सर्व राजकीय पक्ष धर्म आणि जातीवर निवडणूक लढवत आहे. त्यासोबत पैशाची ताकद असते. हे समीकरण मोठ्या पक्षांनी सुरू केले आहे. त्यामुळे जरांगे जे बोलले ते योग्यच आहे अशा शब्दात प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडु यांनी जरांगे यांच्या माघारीची पाठराखण केली.एका जातीचे राजकारण होते, हे मी जरांगे यांना समजावून सांगितले नाही. कारण मी काही कोणाचा राजकीय गुरू नाही. त्यामुळे समजून सांगायची गरज नाही आणि जरांगे तसेही हुशार आहे. मातीवरच्या, जमिनीवरच्या माणसाला समजावून सांगायची गरज पडत नाही. मोठ्या नेत्यांना समजावून सांगणारे पंधरा-वीस लोक असतात. मात्र बच्चू कडू आणि इतर जमिनीवरच्या कार्यकर्त्यांना समजावण्याची गरज पडत नाही, असा टोला कडु यांनी लगावला. मुळात केलेले काम समोर ठेवून निवडणूक लढवली पाहिजे. मात्र सर्व राजकीय पक्षांनी राजकारणाची व्याख्या बदलून टाकली आहे. बच्चू कडू चार वेळेला निवडून आले. कारण पक्षांची झुंडशाही मी माझ्या मतदारसंघातून संपवली, तेच महाराष्ट्रात करू असे ते म्हणाले.मनोज जरांगेवर राजकीय दबाव होता, असे मला वाटत नाही. जरांगे दबावाला बळी पडणारा माणूस नाही. मनोज जरांगेच्या माघारीमुळे कोणाचा फायदा होईल, याचे कुठलेही मोजमाप यंत्र नाही. ग्राउंडवरची राजकीय परिस्थिती वेगळी असते. मनोज जरांगेनी परिवर्तन महाशक्तीला पाठिंबा दिला पाहिजे की नाही, या संदर्भात संभाजी राजे निर्णय घेतील. कोणीही पाठिंबा दिला तरी फायदा होतोच. कोणीही चेंडू टाकला तर आम्ही बॅटिंग मजबूत करतो. बच्चू कडूची बॅटिंग टाइमिंग आणि वार कसा असतो, हे तुम्हाला निवडणुकीत तुम्हाला माहित पडेल.

## संपादकीय..

# दीपोत्सवाच्या सुंदरतेचे मनोहर रंग



राजधानी वर्षभर राजकारणात आकंठ बुडालेली असते. पण दिवाळीचा उत्सव ती अनेक रंगांनी साजरी करते. हरप्रकारची मिठाई हे या आनंदोत्सवाचे रंगबिरंगी रूप. वाढत्या थंडीत दिल्लीकर परस्परांना सध्या दिवाळीची मिठाई खिलवत आहेत. अर्थात, या उत्सवालाही खास मराठी रंगही आहे...

राजधानी दिल्लीत दीपोत्सवाचे रंग वेगळेच असतात. थंडी येत असते आणि गारठ्याने रौद्र रूप धारण करण्यापूर्वी दिवाळी येते. कार्तिकातला तरणाताठा वारा सुटलेला असताना एखाद्या सकाळी–संध्याकाळी 'यलो लाईन मेट्रो'ने चावडी बाजार, चांदनी चौक स्थानकांवर उतरावं.. मुंगीच्या पावलाने सरकणाऱ्या अफाट गर्दीचा भाग होऊन चांदनी चौकातल्या अरुंद बोळातून बाहेर पडावं.. बाहेर पडता पडता बोळाच्या तोंडावरच्या प्रसिद्ध दहीभल्ल्याचा आस्वाद घ्यावा. मग त्या प्रदूषित धुरक्याने वेढलेल्या वातावरणात खोकत खोकत का होईना, नयी सडक किंवा टाऊन हॉलकडे जावं किंवा आशियातली सर्वांत मोठी इलेक्ट्रॉनिक बाजारपेठ असलेल्या भगीरथ पॅलेस, गौरीशंकर मंदिराकडून लाल किल्ल्याच्या रस्त्याला लागावं. 'वतर्मान के मोहजाल में आनेवाला कल न भुलाएं। आओ फिर से दिया जलाएं', या अटल–पंक्ती आठवत, जणू प्रकाशवस्तीच बनलेल्या त्या बाजारपेठांत विहरावं. यातही तनमनाला फ्रेश करणारा आनंद मिळतो !दिल्लीत दिवाळी दोनच दिवसांची. त्यातही 'लक्ष्मीपूजे'ला खास महत्त्व. मिठाई यंदा कोणत्या नेत्याला द्यायची व कोणाला टाळायचे, याचाही चोख हिशोब. विविधतेत एकता म्हणजे कशी, ते शब्दशः शिकवणाऱ्या सरोजिनी नगर, यशवंत पॅलेस किंवा लक्ष्मी नगर, गांधी नगर यासारख्या पूर्व दिल्लीच्या बाजारपेठांपासून उपनगरांपर्यंत जागोजागी मिठायांची दुकानं सजलेली. दिल्लीत दिवाळी म्हणजे मिठाई. चकली, चिवडा वगैरे पदार्थ अस्सल दिल्लीकरांसाठी बहुधा रात्रीचा श्रमपरिहार असावा. 'दिन को होली रात दिवाली' असेही काही बहाद्दर असतातच. गोल मार्केटच्या जवळचं कलेवा, मंडी हाऊसचं बंगाली स्वीटस किंवा नथ्थू स्वीटस ते करोल बागेपासून दिसणारी अग्रवाल मंडळींची मिठायांची दुकानं प्रसिद्ध. ही दुकानं सणासुदीला सरळ पदपथांवर हातपाय पसरून ऐसपैस फैलावतात. पोलिस त्याकडे स्थितप्रज्ञ, वैरागी वृत्तीने पाहत पाहत पुढे जातात. एखाद्याला हटकावे तर तो न जाणो सरळ मोबाईल काढून पोलिस मुख्यालयातल्या आपल्या सायबालाच फोन लावायचा! बनावट खवा विकणारेही मालामाल होतात या दिवसांत. यंदा दिवाळी आलीही नव्हती, तोवर शेकडो किलो बनावट खवा पोलिसांनी जप्त केला.दिवाळीत मराठी मंडळींसाठी खास फराळ बनविणारी चिपळूणकर, रश्मी पुपाला आदी मंडळी सज्ज असतात. चंद्रकांत मटंगे यांच्यासारखे निवडक मराठी बांधव अगदी निवडक पण सुरेख घरगुती फराळ बनवत असत. 'आनंदवन'सारख्या मराठी वसाहतींमध्ये आजही दिवाळीचा मराठी आनंद दिसतो.

मंडी हाऊसच्या कमानी, त्रिवेणी सभागृहांत, श्रीराम सेंटरमध्ये किंवा नेहरू पार्कसारख्या भागांत गीत संगीताचे, कविसंमेलनांचे कार्यक्रमही दिवाळीपासून उत्तरोत्तर रंगत जातात. भारतीय साहित्यानेही दिव्यांच्या सणाला पुरेशी जागा कशी दिली आहे व अत्त दीप भव, यापासून दीपप्रतिपादोत्सव, दीपमालिका यासारख्या शब्दांची पखरण कोणत्या साहित्यात आढळते, याची माहितीही या साहित्यिक कार्यक्रमांतूनच मिळते.

दिल्लीत सर्वपक्षीय दिवाळीलाही स्थान आहे. पूर्वी विश्व हिंदू परिषद व आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे पत्रकारांसाठी 'दिवाळी मिलन' कार्यक्रम नेमाने होतो. अमित शहा अध्यक्ष होते, तोपर्यंत भाजपमध्येही 'दिवाळी मिलन' उत्साहाने होत असे. नितीन गडकरी, राम नाईक, प्रकाश जावडेकर, हंसराज अहिर, विलासराव देशमुख, एस. एस. आहलुवालिया आदी मंत्री, माजी लोकसभाध्यक्ष सुमित्राताई महाजन दिवाळीच्या आसपास थंडीत पत्रकारांसाठी स्नेहमेळावे भरवत. रायसिना रस्त्यावर डॉ. मुरलीमनोहर जोशी यांच्याकडचे दिवाळी मेळावे म्हणजे पत्रकारांसाठी रंजक बातम्या मिळवण्याचेही केंद्र असे. त्यातही त्याच्या केंद्रस्थानी साक्षात जोशीच असत.

नजमा हेप्तुल्ला, शाहनवाज हुसेन, मुख्तार अब्बास नक्वी या भाजप नेत्यांकडेही ईद किंवा होळीनिमित्त मेजवानी असे. काँग्रेसमध्ये किंवा कपिल सिब्बल, भूपेंद्र हुडा, लालूप्रसाद यादव, अमरसिंह, राजेश पायलट आदी नेत्यांकडेही पूर्वी इफ्तार किंवा थंडीतल्या मेजवान्या व्हायच्या. मात्र, पत्रकार असे इरसाल की दुसऱ्या दिवशीच्या पेपरात इफ्तारला कोण आले, यापेक्षा कोण आले नाहीत, यापेक्षाही ते का आले नाहीत, याच्याच खमंग बातम्या झळकत! हे लक्षात आल्यावर काँग्रेसने इफ्तार मेळावेच बंद केले.'राजकारण अत्यंत महत्त्वाचे असते. किती, तर आपण रोज सकाळी प्रातर्विधीला जातो हे जेवढे तेवढेच..', असे एका माजी सरसंघचालकांनी म्हटले होते. दिल्लीत वार्तांकन करणाऱ्यांच्या तर हे राजकारण पाचवीला पूजलेलं असतं.प्रदूषणाला जबाबदार केंद्र का दिल्ली सरकार, आगामी निवडणुकांत काय होणार, नव्या भाजपमध्ये कोणी कोणाला धमकावले, विरोधकांना जंग जंग पछाडूनही जमणार नाही अशी किमया काँग्रेसवाले आपल्या–आपल्यातच कशी करतात, डाव्यांनी स्वतःच्याच पायावर मारण्यासाठी कोणती कुऱ्हाड आणली, आम आदमी वगैरे पक्षांत 'आत जाण्याचा' पुढचा नंबर कोणाचा, वगैरे 'चर्वण' करण्यासाठी अख्खे वर्ष पडलेले असतेच. पण स्वतः जळून दुसऱ्याला प्रकाश देणं, हेच तत्त्वज्ञान सांगणाऱ्या दिव्याच्या सणाच्या निमित्ताने, 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे', या वृत्तीने राजधानीतल्याही हटके जगाचा धावता फेरफटका मारणं, हेच दिवाळीला अधिक श्रेयस्कर नाही का?

# दुष्काळमुक्त मराठवाडा जाहीरनामा हवा

मराठवाड्याचा 'टँकरवाडा' झालेला आहे. जलतज्ज्ञांच्या मतानुसार मराठवाड्यात वाळवंटीकरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. सततच्या दुष्काळामुळे मराठवाड्याचे कधीही भरून निघणार नाही एवढे मोठे नुकसान झाले आहे. सिंचनाअभावी न परवडणारी शेती, गरिबी, बेरोजगारी, स्थलांतर, आरोग्य, शिक्षण विषयक आदी प्रश्नांच्या दुष्टचक्रामुळे आजतागायत दहा हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असून, आत्महत्या सुरूच आहेत. मराठवाड्यात पाण्याअभावी जळालेल्या फळबागा, अतिवृष्टी, गारपीट, नापिकी कर्जबाजारी, शेतमालाचे पडलेले भाव, शेतमाल उत्पादनासाठी वाढलेला खर्च यामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. एकूणच मराठवाड्यातील ग्रामीण जीवन अस्वस्थ आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे मूळही न परवडणारी शेतीच आहे.



**वस्तुस्थिती**

सध्याचे मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र २० टक्के आहे. निसर्गाने महाराष्ट्राला असमतोल पद्धतीने पाणी उपलब्ध करून दिले आहे. विभागनिहाय विचार केल्यास पश्चिम महाराष्ट्राचे क्षेत्र ४६ टक्के आहे आणि पाणी ७४ टक्के. विदर्भाचे क्षेत्र २७ टक्के आणि पाणी १८ टक्के व मराठवाड्याचे क्षेत्र २७ टक्के आणि पाणी फक्त आठ टक्के अशी मराठवाड्याची स्थिती आहे. साधारणपणे प्रतिहेक्टर ३००० घनमीटर पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे; परंतु मराठवाड्यात याची उपलब्धता केवळ १३८३ घनमीटर प्रतिहेक्टर एवढी आहे. दरडोई भाषेत बोलायचे झाल्यास १७०० घनमीटर पाणी दरडोई असणे आवश्यक असताना, मराठवाड्यात फक्त ४३८ घनमीटर दरडोई पाणी आहे. मराठवाड्याच्या ६९ टक्के भाग कायम दुष्काळी असून, रंगनाथन समिती अहवालानुसार, ७६पैकी ५३ तालुके अवर्षण प्रवण क्षेत्रात येतात. बहुतांश भूभाग बेसाल्टचा आहे. मराठवाड्यातील बहुतांश लोकसंख्येची उपजीविका शेती व शेतीवर आधारित उद्योगावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांपैकी ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. बहुतांश शेती ही पर्जन्यछायेवर आधारित आहे. त्यामुळे पाणी प्रश्न निकाली निघाल्याशिवाय मराठवाड्याचा शाश्वत विकास शक्य नाही.

**आजतागायत जलसंपत्ती विकासाचे प्रयत्न**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर विविध आयोग, समिती यांच्या शिफारसी सरकारने अवलंबवलेले जलविषयक धोरण यामुळे मराठवाड्यात सद्यस्थितीत मोठे ११, मध्यम ७५, लघु ७४९ एवढे प्रकल्प आणि गोदावरीवर १५ मांजरा, तेरणा, रेणावर २७ असे एकूण ८७७ प्रकल्प आहेत. या सर्व धरणाची एकत्रित साठवणूक क्षमता ३३२ टीएमसी एवढी निर्माण झालेली आहे. याच्या जोडीलाच महाराष्ट्राने देशाला दिलेली महत्त्वाची रोजगार हमी योजना १९७३पासून राबवण्यात येत आहे. १९८९पासून पान वहाळ, अवर्षण प्रवण कार्यक्रम, हरियाली, वसुंधरा, आदर्श गाव योजना मराठवाडा मिशन, इंडो जर्मन पाणलोट प्रकल्प आदींच्या माध्यमातून पाणलोटासाठी उपलब्ध ५० लाख हेक्टरपैकी २९ लाख हेक्टर म्हणजेच ५८ टक्के क्षेत्रावर माथा ते पायथा उपचार कामे करण्यात आलेली आहेत.

याचबरोबर जवळपास २३ हजार पाझर तलाव ३०४८ कोल्हापुरी बंधारे, सिंचन विभाग लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, सामाजिक वनीकरण, साखळी पद्धतीचे सिमेंट बंधारे मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहेत. कृषी विभागाच्या माध्यमातून सूक्ष्म सिंचन योजना विशेषता फळबागासाठी राबवण्यात आली आहे.

**आजतागायतच्या अथक प्रयत्नातून अनुत्तरित राहिलेले प्रश्न**

उपलब्ध सर्व जलस्त्रोतांचा वापर करूनही मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र २० टक्के एवढीच असून, उर्वरित ८० टक्के शेतीला आपण पाणी देऊ शकलो नाही.

१) आजही मराठवाड्यातील निम्म्या जनतेला पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नाही.

२) पर्जन्यछायेवर अवलंबून असलेल्या ८० टक्के शेतीला शेती क्षेत्राला संरक्षित सिंचनासाठीही पाणी उपलब्ध होत नाही.

३) सततच्या दुष्काळामुळे पाण्याअभावी मराठवाड्यातील ५० टक्के फळबागा जळाल्या.

४) पाण्याअभावी स्थानिक युवकांना रोजगार न मिळाल्यामुळे स्थलांतर वाढले.

५) पाण्याअभावी विविध प्रश्नांच्या दुष्ट चक्रामुळे शेतकरी आत्महत्या थांबू शकल्या नाहीत.

**सिंचन अनुशेष**

मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र २० टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राचे सरासरी ३० टक्के आहे. बांधकामाधीन उर्वरित प्रकल्प पूर्ण करून उपलब्ध पाण्याचा वापर केल्यास मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र २६ टक्के होणार असून, उर्वरित महाराष्ट्र ४५ टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत सिंचन तूट भरून काढण्यासाठी चितळे आयोगाच्या अहवालानुसार मराठवाड्याला किमान २५५ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. मानवी विकास निर्देशांकासह मराठवाडा मागासलेपणाचे मूळच सिंचन अनुशेष आहे.

**राजकीय उदासीनता**

सद्यस्थितीत ज्यांना राजकीय विचारधारा, नीतिमूल्य, पक्षनिष्ठा नाही कपडे बदलावेत असे पक्ष बदलतात, अशा राजकीय नेतृत्वाकडून समाजाचे मूलभूत प्रश्न सुटतील, अशी अपेक्षा करावे का करू नये हाच मुळात प्रश्न आहे. पार्टी विथ डिफरन्स म्हणणाऱ्याकडून थोडी बहुत अपेक्षा होती, आता तीही मावळली. स्वातंत्र्यानंतर १३ महिन्यांनी मराठवाड्याचा मागासलेपणा दूर होऊन सर्वांगीण विकास होईल अशा अपेक्षेने मराठवाडा महाराष्ट्रात विनाअट सामील झाला. नुकतेच हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरा झाले. सर्वांगीण विकासाऐवजी विकासाचा अनुशेष वाढतच गेला. मराठवाड्याच्या मागासलेपणाचे मूळच सिंचनाचा अनुशेष आहे. मराठवाड्यातील राजकीय नेतृत्वाने मराठवाड्याच्या खालील सिंचन विषयक प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही.

– गोदावरी उर्द्वभागात ११५ टीएमसी पाणी अडवणे अपेक्षित असताना १६१ टीएमसी पाणी बेकायदेशीरपणे अडवण्यात आले.

– माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्या कार्यकाळात २००५मध्ये कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत मंजूर केलेले २५ टीएमसी पाणी बीड, धाराशीव, लातूरला मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात फक्त सात टीएमसीचे काम अत्यंत संथ गतीने चालू आहे.

– २३ ऑगस्ट २०१९ शासन निर्णयानुसार पश्चिम वाहिनी नद्यांचे १६८.७५ टीएमसी पाणी दुष्काळी मराठवाड्यासाठी गोदावरीत वळवणे अपेक्षित असताना वाटीभर पाणीही आजतागायत मिळालेले नाही.

– विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ज्या १५ टीएमसीच्या दमणगंगा–एकदरे–वैतरणा नदी जोड प्रकल्पास मान्यता देण्यात आली. यातील ६० टक्के पाण्याचा लाभ नाशिक विभागालाच होणार आहे.

– विदर्भात आवश्यकतेपेक्षा ७१ टीएमसी पाणी जास्तीचे आहे. यापैकी ३४ टीएमसी पाणी वैनगंगा नळगंगा योजनेद्वारे १३ किलोमीटर जास्तीचे कालव्याचे / पाइपलाइनचे काम करून पैनगंगा येलदरीत वळवणे शक्य आहे. ज्याचा लाभ नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्याला सिंचनासाठी होणार आहे; परंतु याकडे लक्ष देणार कोण?

– महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन अधिनियम २००५नुसार सर्व धरण क्षेत्रावर पाणी वापर संस्थांची स्थापना करून पाणी वितरण व्यवस्थापन शेतकऱ्यांच्या हाती सोपवणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात पाणी वापर संस्था स्थापन न केल्यामुळे धरणात पाणी असूनही शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचत नाही.

– लेंडी, ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना, वॉटर ग्रीडसह मराठवाड्यातील ४८ प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असून, १६ प्रकल्पांचे काम सुरूच झालेले नाही. यासाठी कालमर्यादा ठरवणे गरजेचे आहे.

– पिढ्यान् पिढ्या अपूर्ण प्रकल्प, वर्षानुवर्षे साठलेला गाळ, कालवा वितरण व्यवस्थेची दयनीय अवस्था, जलसंधारण कामासाठीचे अकार्यक्षम जलसंधारण आयुक्तालय, गेट नसलेले को बंधारे, सांडवा फुटलेले पाझर तलाव, सूक्ष्म सिंचनाचे रखडलेले अनुदान, अपुरे मनुष्यबळ एवढ्या समस्यांच्या ओझ्याखाली मराठवाड्यातील जल कारभार फसलेला आहे.

सध्याचे मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र २० टक्के आहे. चितळे आयोगाच्या अहवालानुसार, मराठवाड्याच्या न्याय हक्काच्या जलसंपत्तीचे कालबद्ध नियोन करून पर्याप्त, कार्यक्षम व उत्पादक वापर केल्यास सिंचन क्षेत्र ५६ टक्क्यांपर्यंत वाढून अर्थव्यवस्था दुपटीने सुधारेल. मात्र, यासाठी हवी तीव्र राजकीय इच्छाशक्ती. मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींना एकतर पाणी प्रश्न समजलेला नाही किंवा समजून घ्यावयाचा नाही, नाही तर समजल्यास सोडवायचा नाही असा अर्थ होतो. ज्या पद्धतीने मिशन मोडवर समृद्धी महामार्गाचे काम करोडो रुपये खर्च करून करण्यात आले त्या पद्धतीने मराठवाड्याचा दुष्काळ कायमचा संपवणे शक्य आहे. हे सर्वसामान्य जनतेला कळते लोकप्रतिनिधींना का कळत नाही. माझ्या माहितीप्रमाणे यांना मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवायचाच नाही. यांना फक्त या प्रश्नाचे भांडवल करून अनेक विधानसभा निवडणुका निवडणुका जिंकायची सोय करून ठेवायची आहे. उदाहरणार्थ २०१४च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेला मंजुरी दिली होती. आजतागायत दुसरा टप्पा प्रलंबित आहे. या विधानसभेच्या तोंडावर टप्पा दोन मार्गी लागला. प्रत्यक्षात काम बाकी आहे, अशी अनेक उदाहरणे आहेत. दुष्काळमुक्त समृद्ध, संपन्न मराठवाड्याचे स्वप्न साकारण्यासाठी मराठवाड्यातील जनतेने पाणी प्रश्नावर जागरूकता दाखवून सर्व राजकीय पक्षाकडून विधानसभा निवडणूक जाहीरनाम्यात दुष्काळमुक्त मराठवाड्याची लेखी हमी घेण्याची आवश्यकता आहे. समाजाचे मूलभूत प्रश्न बाजूला ठेवून काही पक्ष भावनिक मुद्दे पुढे करण्याची शक्यता आहे. मतदारांनी उमेदवारांना समाजाच्या मूलभूत प्रश्नाविषयी उत्तरदायित्वाची जाणीव करून देण्याची हीच वेळ आहे. विधानसभानिहाय सर्वच पक्षाच्या उमेदवारांकडून पाणी प्रश्न सोडवण्याची लेखी हमी घेतली पाहिजे. मराठवाड्यातील जनतेच्या वतीने मराठवाडा पाणी परिषदेतर्फे तसे लेखी निवेदन सर्वच पक्षाच्या अध्यक्षांना देण्यात आलेले आहे. मराठवाड्यातील सर्व प्रश्नांचे मूळ हे सिंचनाअभावी न परवडणारी शेती आहे. यामुळे ग्रामीण जीवन अस्वस्थ आहे. सर्व राजकीय पक्षांनी मराठवाड्याचा पाणी प्रश्न गांभीर्याने न घेतल्यास मराठा आरक्षणासारखे दुसरे पाणी प्रश्नांचे मोठे आंदोलन मराठवाडा पाणी परिषदेतर्फे उभे करण्यात येईल. याला सर्वच राजकीय पक्ष जबाबदार राहतील.

# इडापिडा टळो आणि बळीचं राज्य येवो...

बळीराजा प्रजेला भेटायला येतो, असं मानतात तो दिवस. 'इडापिडा टळो आणि बळीचं राज्य येवो,' हे आजचं मागणं. इडा म्हणजे पृथ्वी आणि पीडा म्हणजे संकटं, त्रास. 'या पृथ्वीवरची सगळी संकटं दूर होवोत,' असा या प्रार्थनेचा अर्थ. प्रल्हादाचा नातू बळी हा लोकांच्या हृदयातला राजा.वामनानं तीन पावलं जमीन मागत कपटाने बळीराजाला जमिनीत गाडून टाकलं, तो दसऱ्याचा दिवस. प्रजा दुःखात बुडाली. तेव्हा त्याचा मुलगा – बाणासुराने लोकांना धीर देत २१ दिवसांनी बळीराजा त्यांना भेटायला येईल, असं वचन दिलं. खरोखरच बळीराजा आला. त्याच्या स्वागताला घरोघरी दिवे लागले, पक्वान्नं तयार झाली. हा दिवस म्हणजे पाडवा. या दिवशी दरवर्षी बळीराजा प्रजेला भेटायला येतो, ही लोकश्रद्धा. इडापिडा दूर होऊन पुन्हा बळीचं राज्य येवो, ही साध्यासुध्या माणसांची प्रार्थना झाली. बायका लेकराबाळांची दृष्ट काढताना म्हणतात, 'इडापिडा टळो, पाप अमंगळ पळो.' जाळात मीठमोहरीचा तडतडणारा आवाज येतो तेव्हा चिमुकल्यावरचं अरिष्ट दूर झाल्याची खात्री त्या माऊलीला वाटते. संत एकनाथांनीही त्यांच्या गुरूंवरील भक्तीसाठी हा शब्द विलक्षण पद्धतीनं वापरला आहे. ते म्हणतात,शेतकऱ्याला बळीराजाचं रूप मानलं जातं. शेतकरी या देशाचा कणा. देशातले निम्म्याहून अधिक लोक शेती आणि संबंधित व्यवसायात गुंतलेत. पण इथली धोरणं कधीच देशाचं पोट भरणाऱ्या बळीराजाला धार्जिणी नव्हती.



जोडीला दर पिढीत आक्रसणारी शेती, हवामानबदलाचे फटके. कर्जामुळे फाशीचा दोर जवळ करण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. हे सारं कधी तरी बदलेल हा दुर्दम्य आशावाद मात्र बळीराजाच्या प्रजेत कायम आहे; म्हणूनच दारातली पणती आशेचा स्निग्ध प्रकाश अंगणभर पसरवते आहे अन् 'सर्वांच्या आयुष्यातली इडापिडा टळून पाडवा गोड व्हावा,' असं सांगते.

# जनकल्याण ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था
# मर्या.साळेगांव,ता.केज,जि.बीड

जा.क्र/ दि ३१/१०/२०२४ — विशेष वसुली अधिकारी यांचे कार्यालय

## १ नमुना ' झेड '
## नियम १०७ पोट–नियम (११ (ड–११) पहा (पहिली सुधारणा)
## स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी जाहीर नोटीस (प्रकटन)

ज्या अर्थी जनकल्याण ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. साळेगांव, ता.केज, जि. बीड ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम , १९६१ अन्वये नोंदणीकृत पतसंस्था असून सदर पतसंस्थेचे खालील नमूद ऋणको ( थकबाकीदार ) व त्यांचे जामीनदार / मान्यतादार यांचेविरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ ( १ ) अन्वये सदरचे पतसंस्थेने मा. लवाद कोर्ट/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज, ता. केज, जि. बीड यांचे कडील महाराष्ट्र सह. संस्था यांचे कार्यालयाकडून वसुली डिक्री (प्रमाणपत्र) प्राप्त केलेले असून त्याअर्थी मे. लवाद कोर्ट यांचेकडून प्राप्त वसुली डिक्री ( प्रमाणपत्राची ) अंमलबजावणी ही महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ ( १ ) (२) आणि १९६१ चा नियम १०७ व त्यातील उपनियम अन्वये करीत असताना खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी यांचे कार्यालयाव्दारा थकबाकी मागणीची नोटीस खालील नमुद दिनांकास देवून सदरचे नोटीसीमध्ये नमूद केलेली मागणी रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून भरणा करण्यास कळविलेले होते आणि ऋणको (कर्जदार) व त्यांचे जामीदार / मान्यतादार यांना खालील नमुद दिनांकास स्थावर मालमत्ता (मिळकत) जप्तीचा आदेश दिला असुन, त्याअर्थी सदर जप्ती आदेशान्वये पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता ( मिळकत ) जप्त करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी ऋणकोने (कर्जदार ) व त्यांचे जमीदार / मान्यतादार यांनी रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे,ऋणकोला व त्याचे जामिनदाराला / मान्यतादारांना याप्रमाणे जाहीर नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा खाली सही करणार में. विशेष वसुली विक्री अधिकारी यांनी त्यांना प्राप्त महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि १९६१ चा नियम १०७ (११) (ड– १) (पहिली सुधारणा नियम २०१४ दि. ३०/०८/ २०१४ ची अधिसूचना ) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार स्थावर मालमत्तेचा (सिम्बॉलिक) ताबा खलील नमुद दिनांकास घेतला आहे . विशेषकरून ऋणकोला ( कर्जदार ) व त्यांचे जामीनदार / मान्यतादार आणि सर्व नागरीकांना याव्दारे सावध करण्यात येते की, खलील नमूद यादितील स्थावर मालमत्ते संबंधी खरेदी विक्री, गहाणखत, दान, बक्षिस, कुलमुखत्यारपत्र, साठेखत इत्यादी असा कोणताही व्यवहार करू नये आणि असा व्यवहार केल्यास तो जनकल्याण ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. साळेगांव , ता. केज, जि . बीड या संस्थेच्या खालील नमूद यादितील बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकीय आदेशिकेचा खर्च (Cost of process ) इत्यादी खर्चांना अधिन राहावे लागेल याची नोंद घ्यावी.

### स्थावर मालमत्ता (मिळकती ) चे वर्णन

| अ.क्र. | थकबाकदिराचे/जमिनदाराचे/ मिळकतदाराचे नांव | लवाद कोर्ट डिक्रि क्र. व दिनांक | मागणी नोटीस दिंनाक | स्थावर मालमत्ता जप्ती आदेश दिंनाक | सिम्बॅलिक ताबा घेतलेली दिंनाक | गट क्र./प्लॉट नं./ ग्रा.पं.मिळकत नं./ सि.स.नं/नगरपालिका/ नगर पंचायत व वर्णन | ३१/०८/२०२४ अखेर येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार : श्री . इंगळे शरद विजय रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) श्री.घाटुळे वैभव भागवत रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड २ ) श्री. लोखंडे सुजीत लिंबाजी रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | ३८ २०/०९/ २०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे तलाठीसाो साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. इंगळे शरद विजय यांचे मालकीची व ताब्यातील क्षेत्रजमीन त्यांसी गटक्रमांक व उपविभाग ५१६ वामध्ये क्षेत्र २ हे.०० आर त्यांसी आकार २ रु. ७५ पैसे त्यांसी चतु:सिमा : मुळ नकाशा व रेकॉर्डप्रमाणे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१) श्री. इंगळे शरद विजय यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक ( सिम्बॉलिक ) ताबा घेतला असे. | रू.१,२४,०५१/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| २. | कर्जदार : श्री . पठाण फेरोज हमीद रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) श्री. मेडकर संतोष प्रभ्र रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड २ ) श्री. सय्यद उमर अलीपाशा रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | ४२ २०/०९/ २०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे तलाठीसाो साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील जामीनदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. मेडकर संतोष प्रभू यांचे मालकीची व ताब्यातील क्षेत्रजमीन त्यांसी गटक्रमांक व उपविभाग ३७ वामध्ये क्षेत्र ० हे. ३० आर त्यांसी आकार ० रु. ८७ पैसे त्यांसी चतु:सिमा : मुळ नकाशा व रेकॉर्डप्रमाणे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.२) श्री. मेडकर संतोष प्रभु यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक ( सिम्बॉलिक ) ताबा घेतला असे. | रू.३४,१८२/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| ३. | कर्जदार : श्री . पारखे धनराज कल्याण रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) पटणे कैलास काशीनाथ रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड २ ) मुळे सिध्देश्वर शिवाजी रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | २३ ०५/०९/ २०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे ग्रामविकास अधिकारी साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. पारखे धनराज कल्याण यांचे मालकीची व ताब्यातील घरजागा त्यांचा ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ८३० यांचे क्षेत्र ९७.५५ चौ. मी.( १०५० चौ.फूट) पडसर/खुली जागा त्यांसी चतु:सिमा : १) पुर्वेस– दैवशा शंकर राऊत २ ) पश्चिमेस– सुनिल पारखे ३) दक्षिणेस–१५ फूट रस्ता ४ ) उत्तरेस– सय्यद इब्राहीम यांची जागा अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१ ) श्री. पारखे धनराज कल्याण यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतला असे. | रू.६६,२४६/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| ४. | कर्जदार : श्री. टोपे अशोक देवीदास रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) लांडगे बबन दादाराव रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | २५ २०/०९/ ०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे ग्रामविकास अधिकारी साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. टोपे अशोक देवीदास यांचे मालकीची व ताब्यातील घरजागा त्यांचा ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ६१९ यामध्ये अर्धे पक्के घर ( दगड, विटा मातीचे घर ) पाहिला मजला पुर्व–पश्चिम २६, उत्तर–दक्षिण ३० फूट याचे क्षेत्र ७२. ४६ चौ.मी.( ७८० चौ.फूट ) त्यांसी चतु:सिमा : १) पुर्वेस– बाबुराव वैजिनाथ ,२ ) पश्चिमेस– सरकारी रस्ता ,३) दक्षिणेस– बाळासाहेब वैजिनाथ, ४ ) उत्तरेस– आकबर उस्मान अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१ ) श्री. टोपे अशोक देवीदास यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतला असे. | रू २१,३००/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| ५. | कर्जदार : श्री. सय्यद इफरोज दस्तगीर रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) सय्यद समीर नवाबसाहेब रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | ०८ ०५/०९/ २०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे तलाठीसाो साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. सय्यद इफरोज दस्तगीर यांचे मालकीची व ताब्यातील शेत जमीन यांचे गटक्रमांक व उपविभाग १४ यामध्ये क्षेत्र ० हे.२०.०० आर त्यांसी आकार ० रु. ४४ पैसे त्यांसी चतु:सिमा : मुळ नकाशा व रेकॉर्डप्रमाणे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१) श्री. सय्यद इफरोज दस्तगीर यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक ( सिम्बॉलिक ) ताबा घेतला असे. | रू.७,२९,७०३/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| ६. | कर्जदार : श्री. मुळे दत्ता अशोक रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) श्री. बचुटे सुर्यकांत प्रभु रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड २) श्री. गित्ते बाळासाहेब कल्याण रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | १९ ०५/०९/ २०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे तलाठीसाो साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. मुळे दत्ता अशोक यांचे मालकीची व ताब्यातील शेत जमीन त्यांसी गटक्रमांक व उपविभाग १५८ यामध्ये क्षेत्र ० हे. ९७.०० आर त्यांसी आकार २ रु.६५ पैसे पो.ख.०.०२.०० आर त्यांसी चतु:सिमा : मुळ नकाशा व रेकॉर्डप्रमाणे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१) श्री. मुळे दत्ता अशोक यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक ( सिम्बॉलिक ) ताबा घेतला असे. | रू.१,९६,६४८/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| ७ | कर्जदार : वरपे मंगल चत्रभुज रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br>जानीदार : १ ) शिंदे सतिश गोरोबा रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड २) श्री. वरपे गणेश चत्रभुज रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | ११ ०५/०९/ ०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे तलाठीसाो साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) वरपे मंगल चत्रभुज यांचे मालकीची व ताब्यातील शेतजमीन त्यांसी गटक्रमांक व उपविभाग १४५ यामध्ये क्षेत्र ० हे. ०५.५० आर त्यांसी आकार ० रु.१४ पैसे पैकी वरपे मंगल चत्रभुज यांच्या हिस्सापुरते त्यांसी चतु:सिमा : मुळ नकाशा व रेकॉर्डप्रमाणे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१) वरपे मंगल चत्रभुज यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक ( सिम्बॉलिक ) ताबा घेतला असे. | रू.६०,४३८/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |

# कोण कोणाला पाडा असे म्हणू शकत नाही:तशी परिस्थिती पुन्हा राज्यात येणार नाही-पंकजा मुंडे




**पुणे (वृत्तसंस्था)**
आम्ही कार्यकर्ते एक विचारधारा आधारे निवडणूक लढत आहे. आघाडी सरकार जनतेचा विश्वासघात करून सत्तेत आले आणि जनतेकरीता त्यांनी काही केले नाही. लोकसभा निवडणुकीत मराठवाडामध्ये अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली नाही. पण जनता आता सुज्ञ आहे. कोणत्याही फेक नरेटिव्हला ते बळी पडणार नाही. विकासाचे बाजूने जनता मते देईल. कोण कोणाला पाडा असे आता म्हणू शकत नाही, अशी परिस्थिती पुन्हा राज्यात येणार नाही. 'बटेंगे तो कटेंगे 'हा मुद्दा मला पटत नाही, सोशल मीडियावर जे येते त्याच्याशी आम्ही सहमत नाही. मनोज जरांगे यांच्या निर्णयाबद्दल मी काही बोलणार नाही, लोकशाहीत सर्वांना निवडणूक लढण्याचा किंवा न लढविण्याचा अधिकार आहे. त्यांच्या फायदा आणि नुकसानवर आधारित आम्ही निवडणूक लढत नाही, लोकशाहीत विरोधक त्यांची भूमिका मांडतात आम्ही आमचे पक्ष काम करत आहे, असे मत भाजप आमदार पंकजा मुंडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.
यावेळी भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी खासदार डॉ.प्रीतम मुंडे, प्रवक्ते संदीप खर्डेकर, अमोल कवीटकर, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर , नामदेव माळवदे उपस्थित होते.पंकजा मुंडे म्हणाल्या, दिवाळी पार पडली असून भाऊबीज आता झाल्याने सर्वजण निवडणूक तयारीस लागले आहे. पुणे जिल्ह्यात २१ जागा असून १८ आमच्या महायुतीकडे आहे. आता आम्ही सर्व २१ जागा जिंकवणे प्रयत्न करत आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पदभार स्वीकारला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना घेऊन आम्ही मतदार यांच्यापर्यंत पोहचत आहे. सरकारचे उत्कृष्ट निर्णय सोबत घेऊन आम्ही वाटचाल करत आहे. पण लोकसभा निवडणुकीत आम्हाला राज्यात अपेक्षित यश मिळाले नाही. जे फेक नरेटिव्ह तयार करण्यात आले त्यावर आता जनतेचे डोळे खाडकन उघडले आहे. हरियाणामध्ये भाजपला जनतेने साथ दिली असून तेच चित्र राज्यात दिसेल. सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून आम्ही मागील निवडणुकीत विजय मिळवला पण अनपेक्षित आघाडी राज्यात झाल्याने आम्ही काही काळ सत्तेबाहेर राहिलो. मात्र, आता आम्ही पूर्ण तयारीने निवडणुकीत तयारी करत आहे. भाजप मध्ये पक्षाचा आदेश अंतिम असतो, कार्यकर्ते एखादा निर्णय होईपर्यंत वाट पाहतात, मागणी करतात पण त्यानंतर ते पक्ष आदेश पाळतात. जातीचे किंवा धर्माचे ध्रुवीकरण करून मते मिळवणे सवय नव्या पिढीला लागू नये. सरकारने मागील अडीच वर्षात मोठे काम केले आहे त्यामुळे त्यापूर्वी आघाडी सरकारने जे काम राज्यात केले त्यामुळे ते पुन्हा सत्तेत नको असे मतदारांना वाटत आहे. भाजपचे सर्व नेते निवडणूक तयारीस लागलेले आहे. आता निवडणुकीत वेगळे चित्र सर्वांना पाहवयास मिळेल.

# मला साथ द्या,तुमचा भ्रमनिरास होणार नाही–पुजा मोरे




**माजलगाव । प्रतिनिधि**
राजकारण हा शेतकर्यांच्या पोरांसाठी सोप्पा विषय नाही, पण मी तुमच्या सगळ्यांच्या भरोशावर ही हिंम्मत केली आहे. गेवराई मतदारसंघातील ६२ वर्षापासूनची घराणेशाही आपल्याला संपवायची आहे. मला शेतकर्यांचा आवाज बनायचे आहे. यासाठी तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. मला फक्त एकदा साथ द्या, मी तुमचा भ्रमनिरास करणार नाही, अशी आर्त हाक पुजा मोरे यांनी ग्रामस्थांना दिली. त्या गेवराई मतदारसंघातील वेगवेगळ्या गावात प्रचारादरम्यान बोलत होत्या.
महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या अधिकृत उमेदवार पूजा मोरे यांनी मंगळवारी शृंगारवाडी, धर्मेवाडी, शहापूर तांडा, शहापूर, खेर्डा खु., एकदरा, तेलगाव (बु.), पुंगणी, डुब्बा (मजरा), इरला, जायकोचीवाडी, जदीद जवळा, फुलपिंपळगाव, सावरगाव, मंगरूळ १, मंगरूळ २, सावरगाव आदी गावांचा दौरा केला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांना आपली भूमिका पटवून दिली.
मनोजदादा जरांगे पाटील आणि माजी



भुमिका सारखीच आहे. पण ही भुमिका सभागृहात मांडण्यासाठी आपल्या हक्काचा आवाज तिथे असणे गरजेचे आहे. मी ज्या दिवशी विधानसभेत जाईल त्या दिवशी तुम्हाला अभिमान वाटेल असेच काम करून दाखवेल. तुम्ही मला मतदानरूपी आशीर्वाद द्या, मी तुमचा भ्रमनिरास होऊ देणार नाही, असे वचन तुम्हाला देते, असेही पुजा मोरे म्हणाल्या.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | कर्जदार :<br>श्री. मुळे सत्यनारायण अशोक<br>रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br><br>जानीदार :<br>१ ) इंगळे बालाजी बंडु<br>रा.मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड | ०९<br>०५/०९/ ०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे तलाठीसाो साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्री. मुळे सत्यनारायण अशोक यांचे मालकीची व ताब्यातील शेतजमीन त्यांसी गटक्रमांक व उपविभाग १५८ यामध्ये क्षेत्र ० हे. ९७.०० आर त्यांसी आकार २ रु.६५ पैसे पो.ख. ०.०१.०० आर त्यांसी चतु:सिमा : मुळ नकाशा व रेकॉर्डप्रमाणे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१)श्री.मुळे सत्यनारायण अशोक यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक ( सिम्बॉलिक ) ताबा घेतला असे. | रू १.९९,९३९ /– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| ९. | कर्जदार :<br>श्रीमती सरवदे रेखा रामा<br>रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br><br>जानीदार :<br>१ ) मुळे गणेश काशीनाथ<br>रा.मु.पो. साळेगाव,ता. केज,जि. बीड<br>२) सय्यद जुबेर नूरसाहेब<br>रा.मु.पो.साळेगाव,ता. केज, जि. बीड | ०५ .<br>०५/०९/ ०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे ग्रामविकास अधिकारी साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) श्रीमती सरवदे रेखा रामा यांचे मालकीची व ताब्यातील घरजागा त्यांचा ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ५२६ यामध्ये पडसर / खुली जागा, पुर्व–पश्चिम १९ उत्तर–दक्षिण २१ फूट याचे क्षेत्र ३७.०५ चौ.मीं.( ३९९ चौ.फूट ) त्यांसी चतु:सिमा : १) पुर्वेस– संजिवन बापु ,२ ) पश्चिमेस– सरकारी रस्ता ,३) दक्षिणेस– दत्ता भानुदास, ४ ) उत्तरेस– ताराबाई बचुटे अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१ ) श्रीमती सरवदे रेखा रामा यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतला असे. | रू १, ।११,५७७ /– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |
| १०. | कर्जदार :<br>शेख अहेमद बाबुलाल<br>रा. मु.पो. साळेगाव , ता. केज, जि. बीड<br><br>जानीदार :<br>१ ) लांडगे बाळासाहेब नारायण<br>रा.मु.पो. साळेगाव ,ता. केज, जि. बीड<br>२) सरवदे प्रविण चिंतामण<br>रा.मु.पो. साळेगाव ए ता.केज, जि. बीड | ०५ .<br>०५/०९/ ०२३ | २३/०२/२०२४ | ३०/०३/२०२४ | ०१/१०/२०२४ | मौजे ग्रामविकास अधिकारी साळेगांव, ता.केज, जि. बीड यांचे हद्दीतील कर्जदार तथा प्रतिवादी क्र.१) शेख अहेमद बाबुलाल यांचे मालकीची व ताब्यातील घरजागा त्यांचा ग्रामपंचायत मालमत्ता क्र. २९० यामध्ये अर्धे पक्के घर ( दगड, विटा मातीचे घर ) पुर्व–पश्चिम २३ उत्तर–दक्षिण २१ फूट याचे क्षेत्र ४४.८७ चौ.मी.( ४८३ चौ.फूट ) त्यांसी चतु:सिमा : १) पुर्वेस– शिवाजी बुरकुंडे,२ ) पश्चिमेस– सरकारी रस्ता ,३) दक्षिणेस– रहेमान बापुभाई , ४ ) उत्तरेस– विनायक महिपती अशी सदर वर्णनाची प्रतिवादी क्र.१ ) शेख अहेमद बाबुलाल यांचे मालकीची स्थावर मिळकतीचा प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतला असे. | रू १,३७,४२४/– व त्यापुढील व्याज, कायदेशीर शुल्क व शासकिय आदेशिकेचा खर्च (Cost of prcess ) |

**सदरची जाहीर झेड नमुना नोटीस आज दि. ३१/१०/२०२४ रोजी मी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह प्रसिद्धीस दिली असे.**

दिनांक : ३१/१०/२०२४
ठिकाण : साळेगाव

शिक्का

**स्वाक्षारित**
विशेष वसुली अधिकारी
जनकल्याण ग्रामीण बिगरशेती पतसंस्था
मर्या. साळेगांव, ता. केज, जि. बीड

# रमेश गालफाडे यांना जनतेतून चांगला प्रतिसाद



**केज । सचिन भालेराव**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना केज विधानसभा मतदारसंघात जनतेतून चांगला प्रतिसाद भेटत आहे कारण सत्ताधारी पक्षाने स्वतःचेच हित साधून घेतले आहे तरी जनतेतून परिवर्तनाची मागणी होत आहे सतत तेच उमेदवार निवडून केज मधून घराणेशाही हद्दपार करण्याची मागणी जनतेतून होत आहे मागील पाच वर्षांमध्ये विकास काहीच झालेला नसून आमदार मात्र स्वतःचेच हित साधून घेत आहे तर केज तालुक्याचा विकास काही झालेला दिसून येत नाही तालुक्यामध्ये केस तालुक्यामधून नवीन चेहरा निवडून आला पाहिजे अशी जनतेतून मागणी होत आहे तरी बहुजन विकास परिषदेचे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना जनतेतून चांगला प्रतिसाद भेटत आहे खास करून युवावर्ग महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि रमेश तात्या गालफाडे यांच्या पाठीशी उभा राहिलेला दिसून येत आहे केज तालुक्यात सर्वसामान्याचे अनेक प्रश्न आणि अनेक समस्या अनेक वर्ष झाले तरी केज तालुक्याचा विकास मात्र काही झालेला दिसून येत नाही बेरोजगारी तरुणांना काम नाही मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे ऊस तोडून मजुराचे प्रश्न पाणी प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत केज अंबाजोगाई तालुक्यामध्ये चांगला प्रतिसाद भेटत आहे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेतृत्वात केज कायापालट करू विकास काय असते हे दाखवून देऊ असे आश्वासन रमेश तात्या गालफाडे यांनी जनतेला दिले आहे.

# काँग्रेसचे जेष्ठ नेते ऍड.जगतकर यांनी केला काँग्रेस पक्षाचा त्याग

## उमेदवारांला पाठींब्याबाबत लवकरच घेणार निर्णय

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

बीड जिह्यातील काँग्रेस नेतृत्वासह वरिष्ठ नेत्याकडे पाठपुरावा करूनही माझ्या उमेदवारी साठी त्यांनी प्रयत्न केले नाहीत.माझ्या कडे केज मतदार संघाच्या विकासाचे व्हिजन आहे. बीड जिह्यातील काँग्रेस नेतृत्वासह वरिष्ठ नेत्यावर आरोप करत आपण काँग्रेस पक्षाचा त्याग करत आहोत अशी घोषणा काँग्रेसचे जेष्ठ नेते ऍड. अनंतराव जगतकर यांनी केली.

अंबाजोगाई येथिल हॉटेल कृष्णाई येथे मंगळवारी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना ऍड. अनंतराव जगतकर म्हणाले की, काँग्रेसचे विभागाजन झालं त्यावेळी काँग्रेस कडे चिट पाखरू राहील नव्हतं. त्यावेळी आम्ही चार – पाच लोकांनी काँग्रेस पक्षाची पुनर्बांधनी केली. १९८५ साली केज विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे तिकीट मिळालं होते परंतु अंतर्गत बंडाळी मुळे मला पराभव पत्करावा लागला. पूर्वी गॅस एजन्सी साठी अर्ज केला होता. तत्कालीन तहसीलदार पोफळकर यांनी बोलावून मला एजन्सी ला प्रवृत्त केलं. १९८६ ला पाडव्याच्या शुभ प्रसंगी एजन्सी चालू केली. मी काँग्रेसचा प्रदेश प्रतिनिधी आहे. माझ्याकडे केज मतदार संघाच्या विकासाचा मास्टर प्लॅन आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक लढवण्या संदर्भात अशोक पाटील यांचा कॉल आला. ऑगस्ट मध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मला लातूर येथे केज विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारी बाबत विचारणा केली. मी मतदारसंघात फिरून सर्व्हे केला. मला मतदारांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. उमेदवारी साठी तयारी केली. मी शरदचंद्र पवार साहेबाना भेटलो. महाविकास आघाडीत



काँग्रेसला एक तरी जागा सोडा म्हणून मागणी केली. त्यावेळी त्यांनी तुमच्या नेत्याला बोलायला सांगा. त्यांनी केज विधानसभा निवडणुकीत उमेदवारीसाठी आग्रह धरला नाही. नेते खुशाल आहेत, बीड जिल्ह्यात काँग्रेस संपुष्टात आला आहे. माझ्या सारखा व्यक्ती प्रवाहात राहिला मात्र काँग्रेस पक्षात राहून भवितव्य दिसत नाही, टिंगल टवाळीचा पक्ष झाला आहे.

कोणत्या पक्षाला पाठिंब्या द्यायच्या याचा निर्णय आमच्या मित्र परिवार यांच्याशी चर्चा करून नंतर घेईल असे म्हणाले. यावेळी त्यांनी खा.रजनी पाटील यांच्यावर अप्रत्यक्ष तोफ डागत त्यांनी आज पर्यंत काँग्रेस पक्षाला पोषक परस्थिती निर्माण केलेली नाही. तर जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष संपविण्याचा प्रयत्न केला. माझ्या उमेदवारी साठी आम्ही ज्या नेत्यांसोबत होतोत त्यांनीही काडीचा ही प्रयत्न केलेले नाहीत. त्यांनी प्रयत्न केले असते तर केज मतदार संघ काँग्रेस पक्षाला सुटला असता मात्र ते प्रयत्न झाले नाहीत. म्हणून मी काँग्रेस पक्षाचा त्याग करत आहे. माझी ओळख काँग्रेस म्हणून आहे. उद्या राजीनामा पाठवत आसल्याचे त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनो उच्च पदस्थ अधिकारी व्हा,पण आपल्या आई-वडिलांना व परिसरातील नागरिकांना विसरू नका- स्वामी महादेवानंद भारती महाराज

## अंमळनेर येथील लोकमान्य पतसंस्थेच्या वतीने गुणवंतांचा सत्कार संपन्न

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

शिक्षण हे सर्वश्रेष्ठ असून शिक्षणानेच यशाचे शिखर गाठता येते.गरीबीतून मोठ बनायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणानेच माणूस मोठा होतो. शिक्षणानेच आपल्याला मोठेपण आले.हे लक्षात ठेवून आपल्या शिक्षणात आई–वडिलांचा मोठा वाटा असतो.कोणत्याही उच्च पदावर गेलात तरीही आपल्या आई–वडिलांना व परिसरातील समाजाला विसरू नका असे मार्गदर्शन व उपदेश गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी गुणवंत,यशवंत विद्यार्थी यांच्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी केला.

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथे दि.२ नोव्हेंबर रविवार रोजी प्रतीवर्षाप्रमाणे येथील लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामस्थांच्या वतीने परिसरातील उच्च पदस्थ अधिकारी तसेच गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे महंत गुरुवर्य श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय शिंदे दुय्यम निबंधक दापोली, ड.एन.एन.साबळे सीबीआय पुणे नियुक्ती सरकारी वकील,पटेल पीएसआय,आर.एल.उंडे सर,मनोज पवार सर लोकमान्य नागरी पतपेढी चेअरमन,महादेव साबळे सर,सुमित पांगरे,अर्जुन पवार,बेदरे सर,कैलास पवार सर,अंकुशराव पवार आदींची उपस्थिती होती.अध्यक्ष व मान्यवरांचे शुभहस्ते यावेळी परिसरातील उच्च पदस्थ अधिकारी तसेच वैद्यकीय, आरोग्य,पोलीस विभागात



निवड झालेल्या व कार्यरत असलेल्या गुणवंत,यशवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ,फेटा बांधून व स्मृतीचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले. प्रास्ताविक चेअरमन मनोज पवार सर यांनी केले.लोकमान्य नागरी पतसंस्थेच्या वतीने ४ वर्षापासून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक करून हा उपक्रम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा प्रोत्साहन देणार आहे.यामुळे विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून मोलाचे मार्गदर्शनही मिळते.

स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी मार्गदर्शनपर भाषणातून बीड जिल्हा हा धार्मिक,अध्यात्मिक, शैक्षणिक क्षेत्रात खूपच श्रेष्ठ असून या जिल्ह्यात बारा ज्योतिर्लिंगापैकी परळी वैजनाथ तसेच स्वामी बंकट स्वामी आदीसारखे महान संत होऊन गेले.तसेच राजकारणात स्व.गोपीनाथ मुंडे,स्व.प्रमोद महाजन सारखे महान नेते होऊन गेले.तसेच महात्मा गांधी यांनी अहिंसेचा संदेश तर गाडगेबाबा यांनी स्वच्छतेचा संदेश,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची घटना,ज्योतिबा फुले, सावित्रीबाई,कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य या सर्वांचा आदर्श सर्वांसाठी प्रेरणा देणारा असून त्यांच्या विचाराचा सर्वांनी आदर केला पाहिजे असेही ते म्हणाले.यावेळी पीएसआय पटेल,डि.बी.शिंदे, ड.साबळे,उंडे सर,उद्योजक राजेंद्र पवार यांनी भाषणातून चांगले काम करत रहा.यश निश्चित मिळते. पालकांनी आपल्या पाल्यांना खूप शिकवून उच्चपदस्थ अधिकारी बनवा. भावी डॉक्टरांनी गोरगरीब रुग्णांची सेवा करून त्यांचे वर योग्य उपचार करून त्यांचे आशिर्वाद घ्यावेत. चांगल्या कल्पना घेऊन कर्तव्य बजावले तर प्रत्येक क्षेत्रात चांगल्या मार्गाने यश संपादन करता येते असे मार्गदर्शन केले.तसेच यावेळी निवड झालेले विद्यार्थी अनिकेत पोकळे, सुरज पोकळे,अमोल मिसाळ यांनी मनोगतातून आपले अनुभव व्यक्त केले.या कार्यक्रमाला शिक्षक,पालक, डॉक्टर,पत्रकार बबनराव उकांडे,चंद्रकांत पवार,भाऊसाहेब पवार तसेच सुमित पांगरे,अभि पात्रुडकर,भागवत नवले,विठ्ठल नवले,हरि पवार,अनिल हडतगुणे, व्यापारी,ग्रामस्थांसह सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नारायण नरसाळे यांनी तर आभार प्रदर्शन कैलास पवार सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# खोलेश्वरच्या माजी विद्यार्थींचा मेळावा संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या २०१४ साली दहावी उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी कृतज्ञतेचा भाव व्यक्त करत मेळावा संपन्न केला.

दीपावलीच्या सुट्टीत अंबाजोगाईत आलेल्या श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या २०१४ साली दहावी उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेत माजी विद्यार्थी मेळावा घेण्याचे ठरवून आपल्या गुरुजनांचा सत्कार व शाळेला भेट वस्तू देऊन शाळेप्रती असणार स्नेहभाव जपला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बाबुराव आडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक निवृत्ती दराडे, मुख्याध्यापक बा.ह. केंद्रे, व्ही.के. गायकवाड, राजू शेप, सौ.विनया कुलकर्णी, राहुल नाईक, शैलेश कंगळे, ग्रंथपाल रा. ह. कुलकर्णी, व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना शाळेचे मुख्याध्यापक बाबुराव आडे म्हणाले की, माजी विद्यार्थी संघटन ही काळाची गरज आहे. या माध्यमातून शाळेप्रती असणारा विद्यार्थ्यांचा स्नेहभाव जपला जातो. आपल्या गुरुजनां बद्दलचा आदरभाव व स्नेह वृद्धिंगत होतो. या उपक्रमाची इतर माजी विद्यार्थ्यांनी नोंद घेऊन असे माजी विद्यार्थी मिळावी संपन्न करावे असे आवाहन केले.

याप्रसंगी बोलताना माजी मुख्याध्यापक निवृत्ती दराडे म्हणाले की, माजी विद्यार्थी मेळावा हा उपक्रम माझ्या मनाला खूप भावला आहे या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा मिळाला या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेविषयी माजी विद्यार्थ्यांचे असणारे प्रेम व्यक्त होते. सर्वप्रथम माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनेक माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी शाळेला चार कचराकुंड्या भेट दिल्या. या उपक्रमाच्या माध्यमातून मुख्याध्यापक व माजी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला. या उपक्रमात शाळेचे माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077